# नियमित दिवाणी दावा क.९/२०१८ मधील नि.५ खालील आदेश.

(CNR-MHAH21-000071-2018)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अंतर्गत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीने क.१ ते ३ यांनी सदर अर्जावर कोणत्याही प्रकारे म्हणणे दाखल केले नाही, म्हणुन प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द विना म्हणणे चालविण्यात आला.

३. वादी वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता, माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले आहे, त्यावर मी माझे मत कारणांसहित पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुददे; | निष्कर्ष; |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय ? | ...होकारार्थी |
| २ | सोयीचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ? | ...होकारार्थी. |
| ३ | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ..होकारार्थी. |
| ३ | काय आदेश ? | ..अंतिम आदेशानुसार. |

## कारणमिमांसा

४. वादीने दाव्यात नि.क.३ सोबत मौजे जामखेड येथील शेतजमिन गट क.११८६ चा सात बारा उतारा, नगरपरिषद जामखेड यांचेकडील असेसमेंटचा उतारा, फेरफार क.७७८३ व २३२२४ आणि वादीचे खरेदीखत दिनांक ३१/५/२००८ ची सत्यप्रत दाखल केलेली आहे.

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता :—**

५. वादीचे विधीज्ञ श्री. आर.ई. काळे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

६. प्रस्तुतच्या प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, वादीने दावा मिळकत दिनांक ३१/५/२००८ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने घेतल्यानंतर वादीच्या नावाची नोंद फेरफार क्र.७७२३ अन्वये घ ेण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत रेकॉर्ड जामखेडला फेरफार क्र.२३२२४ ने वादीच्या नावाची नोंद झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकतीत वादी करीत असलेल्या बांधकामास हरकत अडथळा केल्याचे वादीने सिध्द केले आहे. प्रथमदर्शनी वादीचा दावा मिळकतीवर ताबा असल्याचे दिसून येत आहे. वादीच्या दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस व उपभोगास तसेच बांधकामास हरकत अडथळा करण्यापासून प्रतिवादींना प्रतिबंधित न केल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होईल. न्यायाचा कल वादीच्या बाजुने आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे, मुद्दा क्र.४ चे उत्तराकरीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## ***आदेश***

१. वादीचा नि.क्र.५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीच्या दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस व उपभोगास तसेच बांधकामास प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम दाव्याचा निकाल लागेपर्यंत त्यांचेविरुध्द देण्यात येत आहे.

(हाश्मी एच.ए.एच.आय.)
दिनांक : ०५/१०/२०१८. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जामखेड.